F-0030382(SLP)

# काव्यप्रेमी...

दिवाळी अंक २०१९



# काव्यप्रेमी...

दिवाळी अंक २०१९

वर्ष : दुसरे


संपादक
आनंद घोडके

सहसंपादक
कालिदास चवडेकर

कार्यकारी संपादक
पी. नंदकिशोर

संपादन सहाय्य
राज भिंगारे, भाऊसाहेब सोनवणे, सौ. आशा पाटील, संदीप वाघोले, दीपक सपकाळ, प्रमोद बाविस्कर, कृष्णा शिंदे, सत्येंद्र राऊत, सौ. जया नेरे, रामदास देशमुख, राष्ट्रपाल सावंत, भाऊसाहेब कोळेकर, श्याम स्वामी

प्रकाशक : काव्यप्रेमी शिक्षक मंच
मुखपृष्ठ व अक्षरजुळणी : प्रदीप शं. कोडगीमठ
प्रकाशन दिनांक : ३१ ऑक्टोबर २०१९
मुद्रक : शक्ती ऑफसेट, सोलापूर
स्वागत मूल्य : ₹ १५१ /-


# अंतरंग

## कथा विभाग


| | | |
|---|---|---|
| गुरू महिमा | सौ. वीणा वि. जोशी | ...१ |
| वांझोटी | अंजली घंटेवार | ...२ |
| वंशवाढ | नवनाथ खरात | ...३ |
| प्रवास दोन घडीचा | विजय फडणीस | ...४ |
| अपेक्षा | सौ. ज्योती जयस्वाल | ...५ |
| लग्न | खाजाभाई बागवान | ...६ |
| स्वप्न | किशोर बळीराम चलाख | ...६ |
| दत्तक | सौ. प्रीती गोगटे | ...७ |
| कधी सुचले तर ! | हेमलता देशपांडे | ...८ |
| भरारी काजलची | सुप्रिया दामोदर दापके | ..९ |
| अखेरची वारी | वासुदेव पाटील | ...१० |
| दिशा नवजीवनाची | सौ. गीता विश्वास केदारे | ...१२ |
| रुखमी | चारुदत्त मेहरे | ...१५ |
| कन्ह्या- वऱ्हाडी कथा | विजय बिंदोड | ...१६ |
| महापुर | कृष्णा प्रल्हाद शिंदे | ...१८ |
| आकडा निर्णयाचा | सौ. वर्षा मनोज भांदर्गे | ...२१ |
| होम मिनिस्टर शेवंताबाई | सौ. आशा अरुण पाटील | ...२३ |


## नाट्यछटा


| | | |
|---|---|---|
| अडाणी बायकू | आबासाहेब घावटे | ...२९ |
| मराठी भाषा जपू या... | आनंद घोडके | ...३१ |


## लेख विभाग


| | | |
|---|---|---|
| नात्यात दुरावा | श्री. युवराज गोवर्धन जगताप | ...३५ |
| महिला सबलीकरण काळाची गरज | श्रीमती मंजू बृजमोहन सराठे | ...३६ |
| मोबाईल संपावर गेला तर...! | आश्विनी पांडुरंग धाट (कुलकर्णी) | ...३७ |
| आधुनिक तंत्रज्ञान लहान मुलांसाठी योग्य की अयोग्य | श्रीमती माणिक नागावे | ...३८ |
| श्रावणास पत्र | सौ. जस्मिन शेख | ...३९ |
| संघर्ष | राजेश साबळे ओतूरकर | ...४१ |
| पोरांच्या बापानी तर नक्की वाचावे | श्री. हणमंत पडवळ | ...४३ |
| माझ्या वडीलांनी भुताला पाहिलं | प्रमोद शं. घाटोळ | ..४४ |
| पूर | विजयालक्ष्मी राऊत-गोरे | ...४५ |
| जहाँ न पहुँचे कर्मी, वहाँ पहुँचे आर्मी | दीपक सपकाळ | ...४६ |
| मोबाईल आपला मित्र | सौ. कल्पना देशमुख | ...४७ |
| आधुनिक सणांची नांदी | सौ. ऋतुजा रविंद्र गवस | ...४८ |
| मला ही हवेत आजी आजोबा | सौ. वर्षा निलेश भोज | ...४९ |
| नो वुमेन्स लँड | श्री. दत्तु लक्ष्मण वारे | ...५० |
| अपेक्षांचे झाड | सौ. प्रिया सुरवसे | ...५१ |
| जोनाथन लिव्हिंगस्टन सीगल | सौ. ज्योत्स्ना आनंद घोडके | ...५२ |
| निसर्गाचे मनुष्यास पत्र | श्रीम. शोभा सुरेश दळवी | ...५३ |
| लोप होत चाललेली पुस्तक वाचन संस्कृती | सौ. निशा डांगे | ...५४ |
| भारताच्या सागरी सुरक्षेला आव्हाने आणि उपाय | महादेव श. खळुरे | ...५६ |
| महिला आरक्षण की पुरुषी सत्तेचे रक्षण | सौ. ज्योती संजय वाघमारे | ...५८ |


**काव्यफुलोरा :** सौ. सीमा प्रदीप भांदर्गे, डॉ. नेहा निलेश संखे, प्रा. संतोष बोंगाळे, सुरेखा धारपवार, सुचिता कुलकर्णी-जोशी, सुरेश नारायण तायडे, बबन धुमाळ, सौ. शिल्पा भांडारी, विजय जोशी, संदीप पाटोळे, पी. नंदकिशोर, श्री. अजबसिंग गिरासे, खुशाल गुल्हाणे, नवनाथ गाडेकर, प्रमोद धना बाविस्कर, रवींद्र बबन तनपुरे, सौ. राजश्री लाहोर ताठे, स्वप्निल मुरलीधर जगताप, श्रीमती सुलभा खुळे, बाळासाहेब तोरस्कर, सौ. मीना महामुनी, सौ. कुमुद एन. कोरडे, सौ. कविता टी. कठाणे, गुरुदत्त दिनकर वाकदेकर, श्रीमती अनिता मेस्त्री, श्रीमती सरला लोटन पाटील, सौ. पल्लवी पाटील, सौ. हेमा विद्वत, सौ. किशोरी शंकर पाटील, प्रिया मयेकर, डॉ. शीतल शिवराज मालूसरे, वैभवी गावडे, प्रा. अशोक श्रीकिसन सारडा, सौ. प्रमोदिनी अनिल देशमुख, श्री. रामदास देशमुख, डॉ. भोजराज लांजेवार, रंजना लसणे, श्री. विजयकुमार देशपांडे, सौ. कविता अजय दाते, श्री. एन.जे. पाटील, डॉ. के डी. संखे, सौ. प्राजक्ता अमृत बोबडे, भारती धुपद-सोळंके, श्री. पांडुरंग टेळे, रणजित पवार, सौ. अर्चना रश्मिकांत मोहनकर, सपना राजेश बांगर भंडलकर, प्रा. सत्येंद्र राऊत, साधनाताई चौधरी, व्यंकटेश काटकर, सौ. सुमन शिवानंद चंद्रशेखर, रवी भोसले, श्रीमती शिनगारे सुवर्णा मधुकर, वंदना सलवदे वाघमारे, अरविंद म्हेत्रे, श्री. राष्ट्रपाल सावंत, सौ. जया नेरे, श्रीमती प्रमिलाताई सेनकुडे, मनाली माळी, बिभीषण गिरी, हंसराज देसाई, राज भिंगारे, दिपमाला सोमनाथ खडके, श्याम श्रीकृष्णराव स्वामी, श्रीकांत वडकुते, विजया पाटील, अंजली श्रीवास्तव शब्दशिल्प, भाऊसाहेब सोनवणे, लक्ष्मण काटकर, प्रमोद गुणवंत भागवत, दर्शना प्रकाश जोशी, संदीप वाघोले, सौ. उज्वला इंगळे, लक्ष्मी मालेराव, चैत्राली जोगळेकर, सौ. माधुरी मालक, रामहरी पंडित, मनिषा रायजादे -पाटील, संगीता वाढोणकर, स्मिता मुराळी, अशोक दगाजी शिंदे

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad


या अंकात प्रसिद्ध झालेल्या साहित्यातील लेखकांच्या विचारांशी अथवा मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही

## पळस : तू

एरवी राठ असतोस
पळसाच्या खोडासारखा ...
काळाशार ...
खरबरीत ... !!

आणि त्याच्या सारखाच
तत्वनिष्ठ
तीन म्हणजे तीनच पाने
किंवा क्वचित
पाच ...तीनच ... नाहीतर पाचच !!

मी ही
मान्य करते
तुझा राठपणा
तुझा खरबरीतपणा
तुझी तत्वनिष्ठता ...टोकाची !!

कारण ...
मला वर्षातून
एकदाच
तुझे फुलणे
अनुभवायचे असते !
तुझा मऊ रेशीम
तलम स्पर्श
पांघरायचा असतो !

तुझे ते लालेलाल
काळ्या देठातून
उगवलेले सौंदर्य
लपेटायचे असते !!

म्हणून
मान्य असतो
तुझा हेका ...
एका फाल्गुन
सुखासाठी !!

सौ. अर्चना रश्मिकांत मोहनकर,
वर्धा

## प्रेमा तुझा रंग माझ्या नजरेतला

प्रेमा तुझा रंग माझ्या रंगासारखा,
तुझ्या स्पर्शात न्हाऊन एकरूप होण्यासारखा....
प्रेमा तुझा रंग अनुभवातून शिकण्यासारखा,
गरुडाच्या उंचच उंच भरारीसारखा....
प्रेमा तुझा रंग श्रावणातील पावसासारखा,
घोंगावत सरसरणाऱ्या वाऱ्यासारखा....
प्रेमा तुझा रंग श्वासात श्वास गुंतल्यासारखा,
तुझ्या विचारांत एकरूप होण्यासारखा.....
प्रेमा तुझा रंग न बोलता उमजण्यासारखा,
नजरेने नजरेला केलेल्या इशाऱ्यासारखा.....
प्रेमा तुझा रंग कोवळ्या कळीसारखा,
गालावर अलगद पडलेल्या खळीसारखा....
प्रेमा तुझा रंग रिमझिम पडणाऱ्या पावसासारखा,
उंचावरून कोसळणाऱ्या धारांसारखा......
प्रेमा तुझा रंग बहरलेल्या वसंतासारखा,
मातीमध्ये दरवळणाऱ्या सुगंधासारखा......
प्रेमा तुझा रंग नकारातल्या होकारासारखा,
पावसाची वाट बघणाऱ्या चातकासारखा.......
प्रेमा तुझा रंग जन्मोजन्मी बांधणारा,
ह्या जन्मात असूनही पुनर्जन्मात शोधणारा
प्रेमा तुझा रंग ... प्रेमा तुझा रंग

सपना राजेश बांगर भंडलकर,
दिघा, नवी मुंबई

### चारोळी

शब्दांत भिजयचा
जडलाय तुला नवा छंद
दरवळतो प्राजक्ताचा गंध
कसा मंद मंद

सुरेखा धारपवार, अकोला

## आई

आई तुझ्या नसण्यामागे
पोरका होऊन बसलोय मी
तुझ्या डोळ्यात पाहिलेल्या स्वप्नासाठी
अहोरात्र कष्ट घेतोय मी

मी आहे तुझा खूपच आभारी
दाखवलीस मला दुनियादारी
पूर्वजन्मीच माझं पुण्य लयभारी
म्हणूनच जन्माला आलो तुझ्यादारी


माझ्या सुखासाठी किती
हाल सोसावे लागले तुला
तुझ्यामुळेच अवगत झाली
जीवन जगण्याची कला

मला आनंदी ठेवण्यासाठी
तू पर्वताएवढं दुःख सोसलं
माझ्यासाठी धडपडणार
हे काळीज तुझं कसलं

तुझ्यासमोर अनेक संकटे होती
तरीही तू पर्वा केली नाहीस
अनेक दुःख सहन करुनही
तू कधीही रडलीच नाहीस

तुझ्याशी आता काही बोलायचे होते
पण लवकरच गेलीस मला सोडून
तुझ्या ममतेच्या कुशीत आणखी
काही दिवस बसायचे होते दडून

प्रा. सत्येंद्र राऊत,
अणदूर





Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad



**झाडे लावा,**
**झाडे जगवा ...**

# काव्यप्रेमी...

अक्षरांचे एक सुंदर गाव आहे काव्यप्रेमी
अंतरंगी एक प्रेमळ नाव आहे काव्यप्रेमी

व्यक्त होण्याचीच प्रत्येकास आहे आस हृदयी
अंतरीचा सप्तरंगी ठाव आहे काव्यप्रेमी

लेखणीच्या लेकरांनी थाटला संसार आहे
नवकवींचा मांडलेला डाव आहे काव्यप्रेमी

माय अपुली ही मराठी होतसे समृद्ध आता
त्याचसाठी घेतलेली धाव आहे काव्यप्रेमी

येथली प्रत्येक व्यक्ती आत्मजाहुन आप्त आहे
कोणही ना रंक अथवा राव आहे काव्यप्रेमी

सत्य, न्यायाची लढाई जिंकण्यासाठी लढूया
वाइटावर घालणारा घाव आहे काव्यप्रेमी

व्यासपीठावर कविंना योग्य जागा देत असतो
अंगभुत अपुल्या गुणांना वाव आहे काव्यप्रेमी

एकमेकांच्या मनांची घेत जातो काळजी अन्
एकमेकांच्या मनातिल भाव आहे काव्यप्रेमी

*- कालिदास चवडेकर*

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad